International Journal of Multidisciplinary Research and Development
Online ISSN: 2349-4182, Print ISSN: 2349-5979, Impact Factor: RJIF 5.72
www.allsubjectjournal.com
Volume 3; Issue 12; December 2016; Page No. 224-226

# निवडणुक सुधारणेतील राजकीय पक्षाच्या योगदानाचा अभ्यास

**प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव**

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख देगलूर महाविद्यालय, देगलूर.

## प्रस्तावना

लोकशाहीचे संरक्षक चाके म्हणून राजकीय पक्षांचा उल्लेख केला जातो. लोकशाहीला दिशा देऊन तिचे संचलन करण्याचे काम राजकीय पक्ष करतात. तर हेच राजकीय पक्ष निवडणुकीतुन सत्ता मिळवून शासन व्यवस्थेचा कारभार आपल्या हातात घेतात. लोकशाहीत राजकीय पक्ष आणि निवडणुका दोन महत्वाचे घटक आहेत. लोकशाही शासन व्यवस्थेत लोकप्रतिनिधींची निवड करणारी निवडणूक ही एक महत्वाची प्रक्रिया आहे. समाज व राज्यात सुशासन स्थापन करणाऱ्या संस्थांचे सदस्य म्हणून या प्रतिनिधिंची ओळख असते. परंतु वर्तमानातील राजकीय संस्कृतीत झालेल्या बदलामुळे आमचे प्रतिनिधिक सभागृह कमकुवत व उदासीन बाले. ज्याचे प्रत्यंतर सभागृहात वारंवार जाणवणारी अनुपस्थिती सतत होणाऱ्या गोंधळातून येते. निवडणुक आयोग आणि शासन निवडणुक प्रक्रियेला स्वच्छ आणि सुकर बनवण्यासाठी प्रयत्नरत असतात. परंतु त्यांच्या या सर्व प्रयत्नांना पक्षीय राजकारण व राजकीय इच्छाशक्तीचा अभाव पूर्ण रुप येवू देत नाही. भारतासारख्या विशाल भूभाग व मतदार असणाऱ्या देशात निवडणूक घेणे एक कठिण व जटिल आहे. तरी राज्यघटनेत निवडणूक प्रक्रिया स्वच्छ, पारदर्शक व निःपक्ष होण्याबाबतच्या अनेक तरतूदी केल्या आहेत. भारतीय राज्यघटनेचा १५ व्या प्रकरणातील कलम ३२४ ते ३२९ मध्ये निवडणूक प्रक्रियेची तरतूद केली. राज्यघटनेच्या ३९ व्या घटनादुरुस्तीनुसार ३२९ (९) समाविष्ट केले. याशिवाय १० वी अनुसूची व उच्च न्यायालयाचे १३६ वे कलम महत्वाचे आहे. कलम ३२७ नुसार मिळालेल्या अधिकारानूसार संसदेत निवडणूकीसंबंधी आवश्यक कायदे बनवले. तसेच वेळो-वेळी त्यात दुरुस्त्याही केल्या. ज्यात लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० व १९५१ संपुर्ण देशात निवडणुका राज्यघटना व संसदेद्वारा निर्माण कायद्यानुसारच संपन्न होतात. याप्रमुख तरतूदींशिवाय निवडणूक प्रक्रियेत असे अनेक प्रकरण घडले ज्यात पैसा, बळ व गुहेगाराच्या वाढीस मदत झाली. निवडणुक प्रणालीत विशिष्ट सुधारणेमुळे निवडणूक प्रणाली सुदृढ बनली. परंतू कांही अशा समस्या आहेत, ज्याना फक्त राजकीय पक्षाच्या संदर्भाने समजण्याची आवश्यकता आहे. कारण निवडणूक प्रणाली जनतेला राजकीय व्यवस्थेच्या निकट आणते. राजकीय पक्षाचा जनतेशी संपर्क निर्माण होतो. निवडणूक प्रणालीत राजकीय पक्षाची भूमिका अत्याधिक महत्वपूर्ण असते. वास्तवतेत राजकीय पक्ष हे राजकीय प्रक्रियेला जोडणे, सरळ करणे आणि स्थिर करण्याचे माध्यम आहे. राजकीय पक्ष संपूर्णतः एक व्यवस्थेचे निर्माते असतात. परंतू वर्तमान काळात राजकीय पक्षाची पारदर्शकता व उत्तरदायित्व यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

## शोध निबंधाचा उद्देश

या लेखातून प्रामुख्याने राजकीय पक्षाचे वर्तन निवडणूक सुधारणेत कसे अडथळे निर्माण करते हे स्पष्ट करण्याचा आहे.

## शोध निबंधाचे गृहितक

राजकीय पक्षाचा व्यवहार निवडणुक प्रक्रियेत अनेक दोष निर्माण करणारे आहे. राजकीय पक्षाची भूमिका निवडणुक प्रक्रियेत सुधारणा करण्याऐवजी ती बिघडवण्यास कारणीभूत ठरणारी आहे.

## तथ्य संकलन

या लेखाच्या मांडणीला अर्थपूर्ण व्हावा यासाठी दुय्यम साधनसामुग्रीचा आधार घेवून मांडणी करण्यात आली. ज्यात नियतकालिके, पुस्तके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, राज्यघटना इ.चा आधार घेण्यात आला.

## संशोधना पध्दती

प्रस्तुत लेखाला संशोधनाचा आधार प्राप्त व्हावा यासाठी ग्रंथालयीन अभ्यास पध्दतीसह विश्लेषण व वर्णानात्मक अभ्यास पध्दतीचा आधार घेतला आहे.

लोकशाही शासन व्यवस्था मजबूत करणे आणि देशास प्रगतिशील बावण्यासाठी योग्य लोकप्रतिनिधींची निवड करणे अत्यंत आवश्यक आहे. ते फक्त स्वतंत्र आणि निःपक्ष निवडणुकीतच शक्य आहे. या दिशेने शासन, न्यायालय आणि स्वतः निवडणुक आयोगाने नेहमी प्रयत्न केले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच निवडणुक प्रणालीत सुधारणेचे प्रयत्न होत आहेत. पहिल्या निवडणुक आयुक्ता पासुन ते आजच्या ि-निवडणुक आयुक्तापर्यंत सर्वांनी आपल्या अहवालात सुधारणेचे उपाय सांगितले. परंतु या सर्वात टि.एन.शेषन यांची भूमिका व कार्य प्रशंसनीय व लोकशाहीला मजबूत करणारे ठरले आहे.

भारतासारख्या विशाल लोकसंख्या व मतदार असणाऱ्या देशांचे राजकीय भवितव्य सर्वोच्च न्यायालय व निवडणूक आयोगावरच आहे. लोकशाही सदैव जिवंत व स्थिर राहावी म्हणुन स्वतंत्र निवडणूक आयोगाची निर्मिती संविधानकारांनी केली. १९५२ पासून ते २०१४ पर्यंतच्या केंद्रीय निवडणुक प्रणालीचा लेखाजोखा पाहता हे मात्र निश्चित की, या देशातील निवडणुक पध्दतीत अनेक सुधारणांची आवश्यकता आहे. ज्याबाबत विचार व्हावा म्हणून १९७५ साली जयप्रकाश नारायण यांनी मुंबई उच्च ऱ न्यायालयाचे माजी न्यायाधीश वी.एम.तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली. १९८१ साली तत्कालीन निवडणुक आयुक्त शामलाल शकधर यांनी निवडणुक सुधारणाबाबत प्रमुख विचार मांडले. १९९२ मध्ये पुहा निवडणुक आयोगानो प्रमुख शिफारशी केल्या. अशा प्रकारे १९९८, १९९९, २००४ आणि २००६ साली निवडणुक आयोगाने महत्वपूर्ण शिफारशी सांगितल्या. १९९९ साली न्यायाधीश बी.पी.जीवारेड्डीच्या अध्यक्षतेखाली निवडणुक सुधारणांसंबंधी विधी आयोगाच्या १७० व्या अहवालात निवडणुकांना पारदर्शक आणि न्यायसंगत बनवण्यासाठी शिफारशी केल्या. सर्वात महत्वपूर्ण उपाय २००२ साली राज्यघटनेच्या समीक्षेसाठी बनवलेल्या राष्ट्रीय आयोगाच्या मांडणीत आला. २००२ साली सर्वोच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेवर निर्णय देताना निवडणूक आयोगाला निर्देश दिला की, दोन महिन्याच्या आत आदेश काढुन प्रत्येक उमेदवारांसाठी उमेदवारीचा अर्ज दाखल करताना शैक्षणिक, गून्हेगारी व संपत्तिक विषयाबाबत माहिती द्यावी. परंतु हे सर्व प्रयत्न निवडणुकीच्या मुळ उद्देश प्राप्तीसाठी व्यवहारात शक्य झाले नाही.

२०१० साली कायदा मंत्री आणि मुख्य निवडणुक आयुक्तांनी संयुक्तरित्या राष्ट्रीय आणि प्रादेशिक विचार विनिमय करुन सुधारणेचे प्रयत्ना केले. २०१३ आणि २०१४ साली काही महत्वपूर्ण निर्णय निवडणुक सुधारणेच्या दिशेने घेण्यात आले. ज्यात राष्ट्रीय माहिती आयोगाने सहा राष्ट्रीय पक्षाना सार्वजनिक प्राधिकरण घोषित करताना त्यांना माहिती अधिकारी नियुक्त करण्याचे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाने एक महत्वपूर्ण फैसला देताना हा निर्देश दिला की, जर निम्न न्यायालयात एखाद्या लोकप्रतिनिधीला गन्हेगारी प्रकरणात दोन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षा सुनावली. असेल तर संबंधित लोकप्रतिनिधीचे सदस्यत्व तत्काळ नष्ट होईल. अशाप्रकारे निवडणुक आयोगास सर्वोच्च न्यायालयाने हा अधिकार दिला की, उमेदवारास शपथपत्र देताना महत्वपूर्ण कॉलम भरणे अनिवार्य केले. अन्यथा त्याचे नामांकन रद्द होवू शकते.

वरील प्रयत्नांशिवाय राजकीय पक्षांनी या प्रयत्नांना यशस्वी बनवण्यासाठी कधी पाऊल टाकले नाही. त्यामुळे भारतीय लोकशाहीसमोर सर्वांत महत्वपूर्ण आव्हान त्याच्या प्रातिनिधीक स्वरुपाला स्वतः प्रतिनिधिमार्फत बदलण्याचे आहे. जे राजकीय पक्षाच्या कार्य संस्कृतीच्या बदलाशी संबंधित आहे. अशाप्रकरे २०१४ ची लोकसभा व विधानसभा निवडणुका, २०१६ मध्ये झालेल्या ५ राज्याच्या विधानसभा निवडणुका व

निवडणुक प्रक्रियेचे विश्लेषण करणे क्रमप्राप्त ठरते. राजकीय पक्षांचे निवडणुकीत विजय मिळवणे हा एकमेव ध्येय असते. त्यामुळे निवडणुक जिंकण्यासाठी सर्व कांही या उक्तीप्रमाणे त्यांचा व्यवहार असतो. २०१४ च्या लोकसभा व विधानसभात भारतीय जनता पक्षाने ज्या पध्दतीने निवडणुक अभियान चालवले तसेच २०१६ मध्ये अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या प्रक्रियेत झालेल्या प्रचाराच्या फेरी तपासता लोकशाहीची लक्तरे वेशीवर टांगल्याचे चित्र कोणासही दिसते.

**अ) संपत्तीचा वापर**

भारतीय राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षाला मिळणाऱ्या पैशासंबंधी व्यापक कायद्याचा अभाव आहे. व्यक्तिगत किंवा व्यावसायिक समुहाद्वारा देण्यात येणाऱ्या देणगीचा काहीच उल्लेख नाही. राजकीय पक्षाला मिळणारी देणगी इंडियन पिनल कोडमध्ये भ्रष्टाचार विरोधी कायद्याअंतर्गतही समाविष्ट केले नाही. ज्याचा फायदा घेवून राजकीय पक्ष निवडणुक प्रक्रियेत करोडो रुपये खर्च करतात. पक्षाच्या उत्पन्नाचे मुख्य आधार चंदा आहे. ज्यातुन अधिक पैसा निवडणुकीच्या नाववरच येतो. जो पैसा दान म्हणून येतो, त्यातील फार लहान भाग निवडणुक आयोगाच्या समक्ष ठेवला जातो. राजकीय पक्षाच्या उमेदवाराची निवडणुकीत खर्च करण्याची मर्यादा निश्चित केली. तरीही राजकीय पक्षाकडुन होणाऱ्या खर्चावर निवडणुक आयोगाचे नियंत्रण नाही. स्वर्गीय गोपीाथ मुंडे एका कार्यक्रमात स्पष्टच सांगितले की, ०८ करोड रुपये खर्च केल्यानंतरच मला खासदारकी जिंकता येते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष-७०० करोड, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-५०० करोड रुपये खर्च करते. यावरुन हे लक्षात येते की, उमेदवार व राजकीय पक्ष निवडणुकीतील खर्चाच्या मर्यादेशिवाय अधिक पैसा खर्च करतात. ग्लोबल इंटीग्रिटीच्या एका अहवालानूसार राजकीय पक्षाला उमेदवाराशी संबंधित आर्थिक माहिती सर्वसामान्य जनतेला उलब्ध करुन देण्याबाबत भारताला १०० पैकी ० गुण मिळाले. विधानसभा, लोकसभा निवडणुकीत करोड रुपये सापडणे हा एक गंभीर गुन्हा आहे. याशिवाय जे सापडत नाहीत त्यांचा काहीच हिशोब ॠ नसतो. निवडणुक आयोगामार्फत निश्चित केलेल्या मर्यादेशिवाय होणाऱ्या खर्चाचे आकलन करणे कठिण कार्य आहे. निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरणाऱ्या उमेदवारांचे अर्ज पाहता, अनेकजण करोडपती असल्याचे नोंदवतात. पैसा आणि निवडणुका हे समीकरण बनले. निवडणुक लढवायची म्हणजे अगोदर आर्थिक तरतूदच करावी लागते. ती ही बुडीत समजुनच राजकारण सत्ता हे जनसेवेचे कधीकाळी माध्यम होते. आज ते धनिकांच्या हातचे बाहुले बनले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष निवडणुकीत भांडवलदार / व्यापारी डोनाल्ड ट्रम्पची होणरी निवड. पैशाचा वापर करुन निवडणुक जिंकणारा भ्रष्टाचार वाढवण्याचे कार्य करतो. नवी दिल्ली विधानसभा निवडणुक अरविंद केजरीवालांच्या आम आदमी पक्षाने जरी कमी खर्च करुन जिंकली असेल विजयानंतरची सत्ता चालवण्याची त्यांची पध्दत ही भ्रष्टाचारीच वाटते.

**ब) राजकीय पक्षांची वैचारिक शुन्यता**

कोणत्याही राजकीय पक्षाचे अस्तित्व त्याची विचारसरणी असते. त्यांच्याशी जनता जुडली जाते. एकनिष्ठ राहते. अशात जर एखादा राजकीय पक्ष संबंधित विचारधारेच्याप्रति निष्ठावान कार्यकर्त्यास आपला उमेदवार न बनवता दुसऱ्यास उमेदवारी देतात. अशावेळेस मतदान करताना जनता संभ्रमित होते की, निष्ठावान कार्यकर्त्याच्या विचारधारेला महत्व द्यावे की उमेदवारास. उत्तरप्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र, पश्चिम बंगालच्या निवडणुकांचे विश्लेषण केल्यानंतर हे स्पष्ट होते की, धर्म, जाति व प्रदेशवादावर आधारित राजकीय पक्ष वैचारिक शून्यतेच्या स्थितीत पोहाचले. सर्व पक्ष एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करतानाचे चित्र बिहार विधानसभा निवडणूक २०१६ मध्ये दिसले. महागाई, शिक्षण आणि आर्थिक विवंचनेकडे ग्रासलेली जनतेला आरक्षण, प्रदेश विभाजन इ. मुद्यांद्वारे प्रभावित करण्याचे प्रयत्न केले जाते. अलिकडील काळात भारतात झालेल्या सर्वच प्रकारच्या निवडणुका पाहता हे स्पष्ट होते की, कोणत्याही राजकीय पक्षाकडे विचारसरणीरुप वैचारिक कार्यक्रमाचा पूर्णतः अभाव आहे. काँग्रेसमुक्त भारत आणि भाजपला विरोध या विचारधारेतूनच पक्षीय संघटन घडते. निवडणुकातील कार्यक्रम फक्त आघाडी शासन चालवण्यापूरता ठरतो. त्यातही अंतर्गत कलह, संघर्ष, गटबाजीच्या राजकारणाचा ऊत माजतो याचे उत्तम उदाहरण महाराष्ट्रातील भाजपा-शिवसेना शासना होय.

**क) पक्षांतर्गत लोकशाही तत्वाचा अभाव**

स्वातंत्र्यापासुनच भारतात स्वस्थ व सक्षम लोकशाहीचा विकास झाला नाही. अनेक राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षाअंतर्गत संघटनेत घराणेशाही व वंशावर आधारित राष्ट्रीय, राज्यीय व स्थाीय अध्यक्ष निवडला जातो. अधिक राजकीय पक्षातील संघटन बांधणी करताना निवडणुकी ऐवजी नियुक्तीचा आधार घेतला जातो. लोकसभा, विधानसभा, विधानपरिषद, स्थानिक स्वराज्य संस्थेतील उमेदवार पक्षाच्या हायकमांडद्वारे निश्चित होतात. पक्षाचे महत्वपूर्ण निर्णय पक्षप्रमुखाकडूनच घेतले जातात. पक्षाच्या निवडणुकात अनियमितता जाणवते. पक्षाचे प्रमुख जे निर्णय घेतील त्याचे पालन करने सर्वांसाठी अनिवार्य असते. उमेदवाराच्या निवडीचा आधार कोणता हे कोणासच माहित नसते. कधी कधी तर पक्षनिष्ठा, सेवा बाजूला सारुन जातिय,आर्थिक गणित साधण्यासाठी उमेदवारी बदलली जाते. यातुनच मग पक्षांतर किंवा पक्षस्थापनेसारख्या घटना घडतात.

वर्तमानात एखादा कार्यकर्ता किती कार्यकुशल, जनसेवक आहे. याशिवाय तो किती आज्ञाधारक व निष्ठावान आहे यास अधिक महत्व आहे. अशाप्रकारे राजकीय पक्षातील केंद्रीय निर्णय घेण्याच्या प्रवृत्तीने पक्षातंर्गत लोकशाहीला नष्ट केले. भारतीय राज्यघटनेने कोणताही भेदभाव न करता सर्व नागरिकांस शासनात सहभागी होण्याची संधी दिली. परंतु राजकीय पक्षांनी नेहमी या तरतुदीची उपेक्षा किंवा अवहेलना केली. महिलांना समान अधिकार देण्याच्या तरतुदीला राजकीय पक्षांनी सदैव चुकीचे ठरवले. निवडणुकीदरम्यान सर्व राजकीय पक्ष महिला उमेदवारास समान महत्व देत नाहीत. पुरुषांच्या तुलनेत महिलांचे उमेदवारीचे प्रमाण अत्यल्प असते. अलिकडे राजकारणात महिलांच्या यशस्वीतेच्या प्रमाणात वाढ होत आहे. तरी त्यांची उमेदवारी रद्द कशी होईल याबाबतचा विचार प्राधान्याने होतो. त्यामुळे राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष आपल्या संघटनास लोकशाहीप्रधान बनवण्यात अयशस्वी राहिले. लोकशाही समाजासाठी राजकीय पक्षाची कार्यप्रणाली लोकशाहीत्मक असावी. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पारदर्शक शासन ई. गव्हर्नस, सामाजिक न्यायाची, महिला सबलीकरणाची भाषा करणारे राजकीय पक्ष सदैव निवडणुकीत महिलाबाबत रुढिवादी विचारधारेचा स्विकार करतात.

**ड) प्रादेशिक पक्षांची वाढती संख्या**

ज्या राजकीय पक्षांना निवडणुकीत निश्चित मतदान व जागा जिंकता येतात त्यानाच निवडणुक आयोग राष्ट्रीय किंवा राज्यीय पक्षाची मान्यता देते. परंतू एक निश्चित मतदान व जागा न मिळवण्याऱ्या राजकीय पक्षांना निवडणुक लढवण्यावर काही प्रतिबंध नाहीत. यामुळे विधानसभा असो की लोकसभा निवडणुक अनेक लहान पक्ष निवडणुकीत आपला उमेदवार उभा करतात. अशा लहान राजकीय पक्षाचे स्पष्ट धोरण नसते, सौदेबाजी करणे ही मुख्य भूमिका असते. वर्तमानात भारतात १७६१ राजकीय पक्ष अस्तित्वात आहे. राजकीय पक्षांच्या वाढत्या संख्येने लोकांत असंमजस्याची स्थिती निर्माण केली.

राजकीय पक्ष सर्वांच्या हिताचे एकत्रित संघटना आहे. परंतू वर्तमानात अधिकतर राजकीयपक्षावर एका विशिष्ट कुटूंबाचे नियंत्रण आहे. राजकारण आणि नातेसंबंध परस्पर अभिन्न बनले. सर्व राजकीय पक्षाचे प्रमुख नेता आपल्या पक्षावर खाजगी संपत्तीप्रमाणे अधिपत्य गाजवतात. यासच अलिकडे एक नवी सरंजामशाही संबोधले जाते. वर्तमानात असे अनेक उमेदवार आहेत त्या ठिकाणा त्यांनी कोणत्याही पक्षाकडूना निवडणूक लढवली तर त्यांचा विजय निश्चित असतो. लोकशाहीला यशस्वी करण्यासाठी या नव्या सरंजामशाहीचा अंत आवश्यक आहे. कारण लोकशाहीत प्रत्येक व्यक्तिला शासनात सहभागी होण्याचा मूलभूत अधिकार आहे. एका ॠ नागरिकांसाठी मतदान करणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच एका उमेदवाराला निवडणुक आयोगाकडुन स्पर्धेची समान संधी मिळवणे.

**इ) ओळखीचे राजकारण : (Identity Politics)**

अलिकडील राज्याच्या विधानसभा निवडणुकीत समुदायाची स्वतंत्र ओळख हा महत्वाचा मुद्दा बनला आहे. मग ते राज्य उत्तरप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, पश्चिम बंगाल ई. महाराष्ट्रात शरद पवार, बिहार-लालूप्रसाद यादव, नितीशकुमार, उत्तरप्रदेश-अखिलेश व मुलायमसिंग यादव, मायावती, तामिळनाडू-जयललिता ई. या सर्वांची ओळख धर्म, जात, वर्ग या आधारावर बनत आहे. अलिकडील राजकारणात जातिय समुदायाचा आधार घेवुन स्वतःची ओळख बनवली जाते. उदा : महाराष्ट्रात महादेव जाकर-धनगर, रामदास आठवले-दलित, छगन भुजबळ-माळी, पंकजा मुंडे-वंजारी, मनोहर धोंडे-लिंगायत, विनायक मेटे-मराठा जातिय समुहाच्या नावावर स्वतःचे नेतृत्व विकसित करुन विधानपरिषदेवरील सदस्यत्व व मंत्रीमंडळात मंत्रीपद मिळवण्याचे गणित बांधले जातात. परंतु या सर्वांमुळे एक व्यक्ति

म्हणुन स्वतःची ओळख विसरली जाते. दलित, मागास, अल्पसंख्यांक, महिला, बालके, अपंग, आदिवासी या सर्वांच्या सामाजिक, आर्थिक विकासाची जबाबदारी यांची असते. परंतु जाति, धर्म, कारखानदार, शेतकरी हितसंरक्षक अशी स्वतःची ओळख जपण्यात अधिक गुंतल्याचे दिसून येते. वैद्यकिय क्षेत्रात जसे विशेषज्ञ आहेत. अगदी त्याचप्रमाणे राजकारणात ही जातिय विशेषज्ञ या संकल्पनेखाली नेतृत्व उदयास येत आहेत. काश्मिरपासून कन्याकुमारी पर्यंत सर्वच ठिकाणी राजकीय पक्ष व त्यातील व्यवस्था पूर्णपणे सांस्कृतिक, सामाजिक वेगळेपण, जाति, संप्रदाय आणि धार्मिक बाहुल्याने प्रभावित बाली. आरक्षण हे सामाजिक न्यायाचे साधन न राहता जातिय हितसंबंधाचे व गरीबी हटावचे समीकरण जुळवणारे साधन बनले. जातिच्या आधाराने मोर्चे-प्रतिमोर्चे काढुन असहिष्णु व लोकशाहीस घातक वातावरण निर्माण करण्यात जातिभिमुख नेतृत्व व पक्षांनी महत्वाची भूमिका वठवली. जातिय ओळख टिकावी म्हणून पक्षबांधणी पक्ष स्थापना, संघटना स्थापना, संस्कार व संस्कृती रुजवणे, अभिवादन पध्दतीचे रुजवणुक करण्याचे कुटील षडयंत्र या देशात सर्वत्र प्रचलित बनले. राष्ट्रीय हिताच्या भावनेपेक्षा जातिय हिताच्या भावनेला प्राधान्य देवून भ्रष्टाचाऱ्याना खतपाणी घातले जाते. जी भारताच्या राजकारणातील लोकशाही व निवडणुक प्रक्रियेला लागलेली किड आहे.

लोकशाहीच्या यशस्वी संचलनासाठी लोकांचे आपल्या प्रतिनिधीवर नियंत्रण असावे. राज्यघटनेने राजकीय पक्ष व लोक प्रतिनिधींची कांही जबाबदारी निश्चित केली नाही. संसदेतील सदस्यांचा सर्वे केला असता कार्हीना देशाचा स्वातंत्र्यदिन, राष्ट्रगीत, राष्ट्रपिता हे माहित नसल्याचे समोर आले. तर बरेच उमेदवार निवडणुकीच्या काळात आपला मतदारसंघ, निवडणुक चिन्ह याबाबत अज्ञानी असल्याचे चित्र बिहार,उत्तरप्रदेश निवडणुकीत दिसुन येते. अशीच स्थिती लोकांमध्ये जाणवते उमेदवारांच्या गोंधळलेल्या अवस्थेमुळे मतदार हे ही विसरुन जातात की, कोणता उमेदवार कोणत्या पक्षाचा आहे, कोणत्या पक्षाने कोणास उमेदवारी दिली. निवडणुक जिंकल्यानंतर उमेदवार मतदारसंघात जात नाहीत. मतदारसंघाच्या समस्यांप्रति जागरुक नसतात. जनता आणि शासनात राजकीय पक्षाची भुमिका मध्यस्थाची असते, जी आज जाणवत नाही. राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या काळात दिलेल्या आश्वासांनाना पूर्ण न केल्यामुळे भारतीय समाजात त्यांच्याविषयी उदासीनता व निष्क्रियतेची भावना उत्पन्न झाली. यामुळे राजकीय पक्षांचा सामाजिक आवाका संकुचित होत आहे. तो वाढावा म्हणजेच मतदार आणि राजकीय नेत्यांत संवाद व्हावा म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी खासदाराना मतदारसंघात जावून जनतेशी विविध योजना, प्रश्नांबाबत संवाद साधण्याचे धडे देतात. तरीही राजकीय नेतृत्वाची उदासीनता, निष्क्रियता त्या आड येते.

### ई) पक्षांतराचे राजकारण

भारतीय संसदेने पक्षांतरावर बंदी आणण्यासाठी १९८५ साली ५२ वी घटनादुरुस्ती केली. या पक्षांतराच्या कायद्याचा मुख्य उद्देश की, राजकीय शक्तींच्या स्वाभाविक संतुलनात कोणत्याही अडथळ्याशिवाय सिध्दांतविहीन आणि अनैतिक पक्षबदलावर निर्बंध लादावेत. यासाठी पक्षात विभाजन आणि पक्ष परिवर्तनास मान्यता देण्यास आली. ज्यामुळे सैध्दांतिक ध्रुवीकरणास मदत मिळावी. परंतु राजकारणात वाढती संधीसाधुवृत्तीमुळे पक्षांतर एक सर्वमान्य व सर्वसाधारण पध्दती बनली. राजकीय सत्ता आणि धन मिळवण्याच्या लालसा पक्षांतराचे मुख्य कारण राहिले. पक्षांतराची प्रवृत्तीने राजकीय वातावरणात दुषित केले. लोकप्रतिनिधीच्या दृष्टीने सिध्दांत, आश्वासन, -नैतिकता हे सर्व अर्थहीन आहे.

१ जुन १९९३ ला तत्कालीन लोकसभा अध्यक्ष शिवराज पाटील चाकुरकरांनी सल्ला देताना सांगितले की, राज्यघटनेच्या १० व्या अनुसूचित उल्लेखित पक्षांतर विरोधी कायद्याच्या अनेक कलमात दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. तज्ञ मंडळीच्या एका समितीद्वारे या कायद्यातील कलम आणि व्यवहाराचे पुर्नपरीक्षण आवश्यक आहे. ज्यामुळे आवश्यक सुधारणा होतील. पक्षांतराच्या कायद्याबाबत पुर्नविचार करताना आवश्यक दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे.

### फ) राजकारणाचे गुन्हेगारीकरण

राजकारणाचे गुन्हेगारीकरण एक असामान्य घटना आहे. राजकारणास समाजसेवेचे क्षेत्र मानले जाते. समाज लोकप्रतिनिधींनी सुसंस्कृत होण्याची अपेक्षा करतो. परंतु बदलत्या काळानुसार भारतीय राजकीय संस्कृतीत अनेक बदल झाले. ज्यामुळे राजकीय पक्ष विचारधारेवर निष्ठा ठेवणाऱ्या कार्यकर्त्याऐवजी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकाना आपले उमेदवार बनवतात. सर्व राजकीय पक्ष आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय हितासाठी सामाजिक कार्यकर्त्याची पार्श्वभुमि नसलेल्या व्यक्तिस उमेदवारी देतात. संसद, विधानसभा, विधानपरिषद, जिल्हा व ग्राम पंचायतेत गुन्हेगारी पार्श्वभुमी असणाऱ्या व्यक्तिंचा सहभाग वाढत आहे. सर्वच राजकीय पक्ष गुन्हेगारी प्रवृत्तीस प्राधान्य देतात. गुन्हेगारी पार्श्वभुमी असणाऱ्या व्यक्तिला राजकीय पक्ष आसरा देतात. लोकप्रतिनिधी समाजात आपला प्रभाव वाढावा आणि गुन्हेगारी कार्य लपवण्यासाठी परस्परांचे सहकार्य करतात. यासाठी समाजात पूर्वीपेक्षा आज राजकीय पक्षाच्या विश्वसनीयतेत बदल झाला. अशा लोक प्रतिनिधीकडून ही अपेक्षा करणे की ते समाज आणि राष्ट्राच्या सेवेला प्राथमिकता द्यावी. एक पोकळ व स्वप्नवत कल्पनेसमान आहे. राजकीय पक्षात गुन्हेगारी प्रवृत्तीचे, लोकांना संरक्षण मिळाल्यामुळे कर्मठ आणि निष्ठावान कार्यकर्त्यांत ही भावना निर्माण होवू लागली.

भारतात निवडणुक सुधारणासाठी राजकारणाचे गुन्हेगारीकरण एक प्रमुख आव्हान बनत आहे. निवडणुक आयोग व सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक प्रयत्नांनतरही संसद आणि विधानसभात गुन्हेगारी पार्श्वभुमीच्या प्रतिनिधींच्या संख्येत वाढ होत आहे. २००२ साली सर्वोच्च न्यायालयाने गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने महत्वपूर्ण निर्णय दिला. ज्यानुसार उमेदवारास घोषणापत्रात आपले शिक्षण, संपत्ती आणि गुन्हेगारीचा सविस्तर उल्लेख करणे अनिवार्य केले. परंतू चुकीची आणि अपूर्ण माहिती दिल्यामुळे उमेदवारी नष्ट होणे किंवा निवडणुक स्थगित होण्यासारखी तरतूद नसल्यामुळे उमेदवार योग्य माहिती देत नाहीत. परंतू अर्जाची तपासणी आणि चुकीची माहिती देणाऱ्या उमेदवाराविरुध्द कार्यवाही आणि विजयी उमेदवाराचे सदस्यत्व रद्द करण्याच्या विषयावर आजही सर्वमान्यता होत नाही. राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि गुन्हेगाराचे राजकारण या विषयावर व्होरा समितीचे १९९३ सालच्या अहवालापासून विधि आयोगाच्या २४४ व्या अहवाल २०१४ पर्यंत या संदभाने उपाय सुचवले. परंतु वर्तमान परिस्थितीत काहीच बदल किंवा सुधारणा होत नाहीत.

अशाप्रकारे निवडणुका व राजकीय पक्षातील संबंधाचे विश्लेषण करुनच निवडणुक सुधारणा यशस्वी करता येतात. राजकारणाच्या गुन्हेगारीकरणास फक्त कायदेशीर किंवा प्रशासकीय तरतूदी करुन रोखता येणार नााहीत. त्यासाठी राजकीय पक्षाना पुढाकार घ्यावा लागेल. कारण पक्ष लोकतांत्रिक नसल्याने इतर संस्था पण अलोकशाही बनतात. अशा स्थितीत देशाच्या धोरण निर्धारणास लोकांच्या वास्तविक प्रतिनिधी नसतात राजकीय पक्ष फक्त शक्तिशाली लोकांच्या हिताचे नायक बनतात.

उपरोक्त विश्लेषणातून हा निष्कर्ष काढता येतो की, काळानुरुप आमच्या समाजातील गुंतागुंत अधिक वाढत आहे. अशात राज्यघटनेद्वारा स्थापित लोकशाही संस्थांना अधिक विकसित होण्याची आवश्यकता आहे. या संदर्भाने समाजात लोकप्रतिनिधींच्या कमी होणाऱ्या विश्वासप्रियतेस टिकवून ठेवण्याची आवश्यकता आहे. जे की निष्पक्ष आणि स्वतंत्र निवडणुकीमुळेच शक्य आहे. लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्ष अनिवार्य आहेत. त्यात सुधारणा झाल्याशिवाय निवडणुक सुधारणा शक्य नाही. राजकीय पक्षावर नियंत्रण आणि पारदर्शकतेच्या दृष्टीने कायदे बनवणे आणि त्याचे सक्त पालन होण्याची आवश्यकता आहे. सर्व राजकीय पक्षानी त्याबाबत प्रतिबध्द असावे व निष्ठापूर्वक प्रयत्न करावे. ज्यामुळे निवडणुका सत्ताप्राप्तीसाठी न होता धोरण व मूल्यांच्या पुनर्स्थापनेसाठी होतील. निवडणुक सुधारणेद्वारेच सत्ता आणि जबाबदारीत संतुलन स्थापन होवू शकते प्रातिनिधिक संस्थांची प्रतिष्ठा टिकवून ठेवण्यासाठी वेळ न दवडता निवडणुक सुधारणा करणे आवश्यक आहे. याचे भान ठेवुनच राजकीय पक्षांनी लोकशाहीचा गाडा आखावा अन्यथा राजकीय पक्षाची अवस्था महाभारतातील चक्रव्युहात फसलेल्या अभिमन्युसारखी होऊन लोकशाहीरुपी व्यवस्थेच्या निर्मितीतील त्यांचे योगदन धृतराष्ट्राप्रमाणे होईल.

### संदर्भ ग्रंथ


1. हमारा संविधान-सुभाष कश्यप-नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली.
2. दुर्गादास बसु-भारताचे संविधान-एक परिचय.
3. निवडणुक जिंकण्यासाठी सर्व काही-डॉ.दिलीप सरवटे, डॉ.उदय निरगुडकर, राजहंस प्रकाशन-२००९.